सन २०१७१-८ मधील अर्थसंकल्पीय
<u>अनुदानाचे वितरण</u>
नागपूर उड्डान क्लब, नागपूर

# महाराष्ट्र शासन

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन शुध्दीपत्रक क्र .बीयुडी १६१७/प्र.क्र.१०४/२८-अ**

**हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**दिनांक : ०५ डिसेंबर, २०१७.**

**<u>वाचा</u>:- शासन निर्णय क्र.बीयुडी १६१७/प्र.क्र.१०४/२८-अ,**
**दिनांक १०/११/२०१७**

**<u>शासन शुध्दीपत्रक</u>**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये नागपूर उड्डान क्लब, नागपूर यांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतूदीच्या ७०% तरतूद उपलब्ध करुन देण्यास शासनाची मंजूरी देण्यात आली होती. सदर शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.३ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

"सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता वरील विवरणपत्रामध्ये दर्शविल्यानुसार निधी वितरणासाठी उपआयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,नागपूर यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. "

**याऐवजी उपरोक्त परिच्छेद क्र.३ आता खालीलप्रमाणे वाचावा**

"सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता वरील विवरणपत्रामध्ये दर्शविल्यानुसार निधी वितरणासाठी तहसिलदार (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांना आहरण व संवितरण अधिकारी व विभागीय आयुक्त,नागपूर यांना नियंत्रक अधिकारी घोषित करण्यात येत आहे."

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१२०५१२०९००१००७ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shubhangi Suhas Agashe

Digitally signed by Shubhangi Suhas Agashe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=172255ef061cede931f38d47a523ff38ab66ea8d7033b5f7ebcf3045a75b6735, cn=Shubhangi Suhas Agashe
Date: 2017.12.05 14:55:44 +05'30'

**( शुभांगी आगाशे )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. जिल्हा कोषागार अधिकारी,नागपूर
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६. कार्यासन अर्थसंकल्प-१३/व्यय-४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सामान्य प्रशासन विभाग / कार्या.२५, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती.

२४५।७.प्र

सन २०१७-१८ मधील अर्थसंकल्पीय अनुदानाचे वितरण
नागपूर उड्डान क्लब, नागपूर

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.बीयुडी १६१७/प्र.क्र.१०४/२८-अ
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १० नोव्हेंबर, २०१७.

वाचा:- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३०.६.२०१७.
२) नागपूर फ्लाईंग क्लब,नागपूर यांचे दिनांक २६/९/२०१७ चे पत्र व सहपत्र.

**प्रस्तावना :-** वित्त विभागाच्या संदर्भ क्र. १ च्या शासन परिपत्रकान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील प्रथम नऊमाहीकरीता म्हणजेच माहे एप्रिल २०१७ ते माहे डिसेंबर २०१७ करीता योजनांतर्गत व योजनेतर अर्थसंकल्पीत निधी खर्च करण्याची मर्यादा अर्थसंकल्पीय तरतूदीच्या ७०% एवढी विहित केली आहे. त्यानुसार सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतूदीच्या ७०% ची तरतूद उपलब्ध करण्यात आली आहे. नागपूर फ्लाईंग क्लब यांच्या संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये आर्थिक वर्ष सन २०१७-१८ मधील ८०% अनुदानाचे लेखाशिर्ष निहाय वाटप करण्याबाबत विनंती केली आहे.

**शासन निर्णय :-**

संदर्भ क्र.१ च्या शासन परिपत्रकानुसार मागणी क्र.-ए-७ "३०५३, नागरी विमानचालन (८०) सर्वसाधारण (००३) प्रशिक्षण (००) (००) (०१) नागपूर उड्डान क्लबकरीता सहायक अनुदान (३०५३ ००१२) या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील प्रथम नऊ माहीकरीता म्हणजेच माहे एप्रिल २०१७ ते माहे डिसेंबर २०१७ करीता नागपूर फ्लाईंग क्लबच्या खालील विवरणपत्रामध्ये नमूद केलेल्या शासन मान्य बाबींसाठीच्या खर्चाकरिता एकूण रू.५३.१५ लक्ष (अक्षरी रू.त्रेपन्न लाख पंधरा हजार फक्त) इतके सहायक अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

| मागणी क्र. | प्रधानशीर्ष/ गौण शीर्ष | उद्दिष्ट | वित्तीय वर्ष २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय तरतूद | वितरणासाठी प्रस्तावित ७०%तरतूद |
|---|---|---|---|---|
| ए-७ | ३०५३, नागरी विमानचालन-००३, प्रशिक्षण (००) (०१) नागपूर उड्डान क्लबसाठी सहायक अनुदान (३०५३००१२) | ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) | २०.०० | १४.०० |
| | | ३६ सहायक अनुदान (वेतन) | ५५.९३ | ३९.१५ |
| | एकूण | | ७५.९३ | ५३.१५ |

२. सदर खर्च मासिक निधी वितरण प्रणालीच्या अधीन राहून मंजूर करण्यात आलेल्या तरतूदी एवढाच मर्यादित ठेवावा व शासन मान्यताप्राप्त बाबींवरच खर्च करण्यात यावा. तसेच खर्चाचा प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास सादर करावा.

३. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता वरील विवरणपत्रामध्ये दर्शविल्यानुसार निधी वितरणासाठी उपआयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शुभांगी आगाशे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी,नागपूर
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
कार्यासन अर्थसंकल्प-१३/व्यय-४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
सामान्य प्रशासन विभाग / कार्या.२५, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.